देशोन्नती दि. 12.7.25

# नांदेड ग्रामीण पोलिसांनी चार पोलिस ठाण्याअंतर्गत केले गुन्हे उघड

## पाच घरफोडी, मोटारसायकल व ३० मोबाईल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन



**नांदेड** : नांदेड ग्रामीण पोलिसांनी केलेल्या कारवाईत शहरातील एकूण चार पोलिस ठाण्याअंतर्गत गुन्हे उघडकीस आणलेअसून ४आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ५ घरफोडीचे गुन्हे उघड करून मोटारसायकल व २० मोबाईल असा एकूण ३ लाख ४१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सूरू केलेल्या ऑपरेशन फ्लॅशआऊट अंतर्गत उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदारांनी १० जुलै रोजी मिळालेल्या माहितीवरून आरोपी दिवेश मारोती कदम रा. बळीरामपूर यास ताब्यात घेवून मोटारसायकल बाबत विचारपुस केली असता सदरची मोटारसायकल चोरीची असल्याचे सांगितले. आरोपीकडे आणखी सखोल चौकशी केली असता आरोपीने त्याचे साथीदार संदीप पवार (२३), सूरज उर्फ बिचू (२८) व सुनिल उर्फ काळया (२७) तिघे रा. पावडेवाडी नाका यांनी मिळून नांदेड ग्रामीण, भाग्यनगर, शिवाजीनगर व विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी चोरी व घरफोडी केल्याचे कबुल केले. तसेच नांदेड ते हैद्राबाद जाणाऱ्या - येणाऱ्या रेल्वेमधुन, वेगवेगळ्या रेल्वेस्टेशनवरून तसेच नांदेड शहरातील रेल्वेस्टेशन, बसस्टँड, श्रीनगर, मालेगाव रोड, गोकुळनगर तसेच ग्रामीण हद्दीतून अनेक मोबाईल चोरल्याचे सांगितले. यावेळी आरोपीच्या घराची झडती घेतली असता त्याच्या घरातून उपरोक्त एकुण २ लाख ४१ हजार रुपयाचा मुद्देमाल मिळून आला. या कारवाई पथकात पोउपनि बाबुराव चव्हाण, सपोउपनि वाकडे, पोहेकॉ कन्हाळे, भिसे, माळगे, गायकवाड, कदम आदींचा समावेश होता.